## प्रतिवादीं तर्फे उलटतपास – श्री. बी. के. देसाई वकील.

**१५.** माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. माझे माहेर मुंबई असून मी गावी ये-जा करत असून मुंबई येथे राहते. माझे १९८० साली लग्न झालेले आहे. मला इतर वादींनी त्यांच्या वतीने पुरावा देण्याबाबत लेखी वटमुखत्यारपत्र दिलेले नाही. माझ्या सर्व मुलांची लग्ने झालेली असून ते मुंबईत राहतात.

**१६.** आमची गावामध्ये तीन ठिकाणी शेती आहे. आमच्या गट क्र.२७ च्या जमिनीचे क्षेत्र २ गुंठे असून मला इतर जमिनींचे गट क्रमांक व त्यांचे क्षेत्र आठवत नाही. घराचे ग्रा. मि. क्र.३१, २२ व ३४ आहेत. मला त्या मिळकतींचे नगरभूमापन क्रमांक सांगता येणार नाहीत. मला शेतमिळकतींच्या व घर मिळकतींच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाहीत. मी स्वतः वकिलांना या दाव्याबाबत माहिती दिली आहे.

**१७.** मी घर मिळकतींची किंमत एक लाख रुपये असल्याचे अंदाजे नमूद केली आहे. मी त्यांची शासकीय कार्यालयातून किंमत ठरवून घेतलेली नाही. मला माझ्या सास-यांच्या दावा मिळकतींपैकी कोणत्या मिळकती स्वकष्टार्जित व वडिलोपार्जित आहेत याबाबत सांगता येणार नाही. माझे सासरे देशपांडे यांचे कूळ होते. त्यांच्यामध्ये कूळाचे प्रकरण चालले होते. दावा मिळकतींचे माझे सासरे हे एकमेव मालक होते.

**१८.** माझे पती घरातील गरीबीमुळे मुंबई येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी गेले होते, ते पुढे मिलमध्ये कामाला लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते बदली कामगार म्हणून मिलमध्ये कामाला लागले होते. माझे पती सुरुवातीला गाववाल्यांच्या खोलीत एकत्रीत राहत होते. माझ्या पतीला सुरुवातीला त्यांच्या खाण्यापिण्या पुरते जेमतेम उत्पन्न मिळत होते. आमच्या लग्नानंतर आम्ही भाडोत्री खोलीमध्ये राहिलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने माझ्या सास-यांकडून मुंबईमध्ये खोली घेण्यासाठी आर्थिक मदत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी माझ्या सास-यांनी एकत्र कुटुंबातील म्हैस व बैलजोडी विकून पैसे दिले होते.

**१९.** माझ्या पतीने गोरेगाव येथे ८ x ८ ची एक खोली घेतली होती. आज देखील आमच्याकडे तीच खोली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने दोन खोल्यांचे

घर विकत घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीच्या नावे एकत्र कुटुंबातून मुंबईतील खोली घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मुंबई येथील आमच्या खोलीची किंमत एक ते दिड कोटी आहे. आमच्या खोलीची किंमत माझ्या मते आठ लाख रुपये आहे.

**२०**. माझ्या सास-यांना कूळाच्या शेतजमिनी मिळालेल्या आहेत. त्या माझ्या सास-यांनी त्यांच्या स्वकष्टार्जित उत्पन्नातून घेतलेल्या आहेत. त्यामुळे माझ्या सास-यांना त्या मिळकती गहाण-दान करण्याचा संपुर्ण अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुंबईची खोली एकत्र कुटुंबाची असून देखील आम्ही दाव्यात समाविष्ट केलेली नाही. माझे पती नोकरीमुळे आमच्यासह मुंबईत राहत होते. साक्षीदार सांगते, तीचे पती गावी येणे-जाणे करत होते. त्यावेळी माझे सासरे गावी राहून शेती करत होते.

**२१**. **प्रश्न** - तुमच्या सास-यांना दत्तात्रय शेती करण्यास मदत करत होता ?
**उत्तर** - माझे पती मुंबईला असताना मी ८ ते १० वर्षे गावी राहून सास-यांना शेती करण्यास मदत केली होती.

**२२**. हे म्हणणे खरे नाही की, मी अथवा माझ्या पतीने कधीही माझ्या सास-यांना शेती करण्यास मदत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मुंबईला गेल्यापासून त्यांच्या परिवारापासून विभक्त राहत होते. माझे पती मुंबईला राहत असल्या पासून त्यांचा व प्रतिवादी क्र.१ चा स्वतंत्र व्यवहार आहे.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दि.१९.०१.१९९५ रोजी खोटे वाटणीचे स्मरणपत्र तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने प्रतिवादी क्र.१ ला कधीही आर्थिक मदत केलेली नाही. माझ्या पतीने प्रतिवादी क्र.१ च्या लग्नासाठी आर्थिक मदत केलेली असून याव्यतिरिक्त इतर मदत केलेली नाही.

**२४**. मी १९९५ साली मुंबईला राहत होते. १९९५ साली पंच बचाराम सावंत व गोविंदा हरणे यांच्या समक्ष घरामध्ये वाटप झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, बचाराम सावंत व गोविंदा हरणे माझ्या सास-यांशी संबंधित नव्हते. बचाराम व गोविंदा माझ्या पतीच्या वयाचे होते.

**२५**. १९९१ साली माझी सासू वारली आहे. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना आमच्या गावाच्या जवळपास लग्न करुन दिलेले आहे. माझ्या सासूच्या निधनानंतर सास-यांनी दुसरे लग्न केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या सास-यांची सर्व सेवा-सुश्रूषा प्रतिवादी क्र.१ करत होता. माझे सासरे त्यांच्या मृत्यूपर्यंत प्रतिवादी क्र.१ सोबत राहत होते. माझ्या सास-यांचे व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे जेवढयास तेवढे संबंध होते. प्रतिवादी क्र.२ ते ४ हे गावाजवळ राहत असल्यामुळे माझ्या सास-यांना भेटत होत्या.

**२६**. मला माझ्या पतीच्या आजारपणासह लहान मुलांमुळे गावी नियमित येणे जमत नव्हते. १९९५ साली झालेल्या वाटपाच्या वेळी प्रतिवादी क्र.२ ते ४ त्यांच्या सासरी होत्या. मी १९९५ साली गावी राहत असल्यामुळे मला त्याबाबत माहिती आहे. मला १९९५ सालचा वाटपाचा दस्त कोणी लिहिला याबाबत सांगता येणार नाही. आम्ही १९९५ च्या वाटपाप्रमाणे नोंद होण्यासाठी तलाठयाला अर्ज दिला होता. त्या अर्जाप्रमाणे तलाठयांनी नोंदी घेतल्या नव्हत्या. (साक्षीदाराला तुम्ही पुढे नोंद घेण्याबाबत काय कारवाई केली याबाबतचा वारंवार प्रश्न विचारुन देखील ती कोणतेही उत्तर देत नाही.) साक्षीदार पुढे सांगते, तीने नोंद घेण्याबाबत पंचायतीमध्ये अर्ज दिला होता. मी त्या अर्जाची नक्कल पुढील तारखेला न्यायालयात सादर करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्या प्रमाणे १९९५ साली कोणताही वाटपाचा दस्त झालेला नसून माझ्या पतीने साक्षीदारांच्या मदतीने खोटा दस्त तयार केलेला आहे.

**२७**. हे म्हणणे खरे नाही की, मी १९९५ च्या वाटपाप्रमाणे नोंद होण्यासाठी तलाठी अथवा पंचायतीमध्ये कोणताही अर्ज दिलेला नसल्यामुळे त्याबाबतच्या नोंदी झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, १९९५ च्या वाटपावरुन माझ्या पतीला कोणताही हक्क व अधिकार मिळालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यांच्या आजारपणामुळे प्रतिवादी क्र.१ हा एकटाच सर्व शेतजमिनी वहिवाटून उत्पन्न घेत होता.

**२८**. माझे सासरे मृत्यूपूर्वी आजारी होते. हे म्हणणे खरे नाही की, मी १९९५ च्या

दस्तावरुन झाडाबेटांची व जमिनींची वाटणी झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीने नेसरकरांकडून २,०००/- रुपये ऊसने घेऊन सास-यांच्या जमिनी सोडवून घेतल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९९५ च्या वाटपा प्रमाणे माझ्या सास-यांना दोन मण भात व २००/- रुपये देण्याचे ठरल्यामुळे दावा मिळकतीत हिस्सा देण्यात आला नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने १९९५ च्या वाटपा प्रमाणे माझ्या सास-यांना कधीही धान्य व रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती वाटपास पात्र नाहीत.

**२९**. गट क्र.६४ ची काही जमीन पाझर तलावासाठी संपादीत झालेली असून त्याचा मोबदला प्रतिवादी क्र.१ ने एकटयानेच घेतलेला आहे. १९९५ च्या वाटपामध्ये प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना हिस्सा दिलेला नव्हता. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना त्यांचा हिस्सा मिळायला पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना १९९५ च्या वाटपात हिस्सा दिलेली नसल्याची बाब चुकीची आहे.

**३०**. आम्ही गट क्र.६४ च्या नुकसान भरपाईचे पैसे मिळाले नसल्याबाबत कोठेही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा त्या पैशांशी काहीही संबंध नसल्यामुळे आम्ही त्याबाबत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, १९९५ च्या वाटपा प्रमाणे माझ्या पतीला कधीही स्वतंत्र हिस्सा मिळालेला नाही. माझ्या पतीला सुरुवातीला कमी पगार मिळत असल्यामुळे आमचे कुटुंब आर्थिक तंगीत चालत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने स्वकष्टाने मुंबई येथे खोली घेतल्याचे खोटे सांगत आहे.

**३१**. आज रोजी मलिग्रे गावामध्ये आमचे घर नसून केवळ रिकामी जागा शिल्लक आहे. प्रतिवादी क्र.१ सध्या भाडोत्री घरात राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादी क्र.१ ला घर बांधण्यासाठी विरोध केल्यामुळे त्याने जमवलेल्या साहित्याचे नुकसान झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला माझ्या सास-यांनी मृत्यूपत्राने घर दिलेले असून त्याबाबतची सरकारी नोंद झाली आहे. मी त्याबाबत या

दाव्याव्यतिरिक्त आजपर्यंत कोठेही तक्रार केलेली नाही.

**(प्रतिवादींतर्फे नि. क्र.५८ प्रमाणे दिलेल्या मुदत अर्जावरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)**

**उलटतपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०८.०१.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.